
Special Issue 7th
January, 2018

ISSN-2250-0383
UGC Approved (SL NO. 2630)
Journal No. 48999.
IMPACT FACTOR - 0.421

# SHODHANKAN

## STRATEGY OF WAR AND PSYCHOLOGY



- EDITORS -
Dr. Abhimanyu Dhormare
Dr. Ashok Kanade

Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पेपरचे नांव | संशोधकाचे नांव | पांन नंबर |
|---|---|---|---|
| 1 | मराठेशाहीतील साडेतीन शहाणे : व्यक्तिमत्त्व विशेष | प्रा.केरकळ अर्जुन शंकर | 01 ते 03 |
| 2 | शीतयुध्द | प्रा. अरूण महादेव राख | 04 ते 05 |
| 3 | सायबर युध्द : एकविसाव्या शतकातील युध्दशस्त्र | प्रा. जाधव बी. एस. | 06 ते 08 |
| 4 | गनिमी कावा:एक मानसशास्त्रीय युद्ध तंत्र | प्रा.बप्पासाहेब रामलिंग शेजूळ | 09 ते 12 |
| 5 | मराठेकालिन गनिमी युध्दतंत्र | प्रा.डॉ.भारती नवथर | 13 ते 15 |
| 6 | इतिहास लेखनामागील इतिहासकाराची मानसिकता | प्रा.डॉ. सय्यद मुजीब मुसा | 16 ते 17 |
| 7 | दहशतवाद, दहशतवादी आणि मानसशास्त्र | प्रा. अमित हुकुमचंद राऊत | 18 ते 21 |
| 8 | यावलीचा स्वातंत्र्य संग्राम | डॉ.अनुप्रिता जे.मापारी | 22 ते 24 |
| 9 | विनोबा भावे यांची अहिंसक क्रांती विचार धारा : भूदान चळचळीच्या संदर्भात | प्रा.धनेश मधुकर हरड | 25 ते 27 |
| 10 | मानसशास्त्रीय युद्ध आणि तिचे महत्त्व | डॉ.तोडकर बी.डी. | 28 ते 33 |
| 11 | दहशतवाद | प्रा.डॉ.गो.प.भालेराव | 34 ते 36 |
| 12 | भारतीय स्वातंत्र्यलढयात परदेशी महिलांचा सहभाग | प्रा काकडे एल.बी. | 37 ते 39 |
| 13 | दहशतवादयांची मानसिकता | प्रकाश साबळे | 40 ते 43 |
| 14 | दुसरे जागतिक महायुध्द व हैद्राबाद संस्थान | प्रा.डॉ. प्रशांत देशमुख | 44 ते 51 |
| 15 | भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील मवाळांचे योगदान | प्रा. डॉ. राजाराम रामदास सोनवणे | 52 ते 54 |
| 16 | युध्दामध्ये मानसशास्त्राची भूमिका व योगदान | प्रा. रामेश्वर बाबासाहेब राऊत | 55 ते 57 |
| 17 | भारताच्या सुरक्षा व्यवस्थेला आयसिस या दशहवादी संघटनेच्या वैचारिक प्रसाराचा धोका | प्रा. संदीप गवते | 58 ते 63 |
| 18 | पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांचे परराष्ट्र धोरण : भारत आणि चीन संबंध | प्रा.संदिप नामदेवराव मिरे<br>प्रा.डॉ.हरी नारायण जमाले | 64 ते 66 |
| 19 | लष्करी सेवेमध्ये मानसशास्त्राची भुमिका | श्रीमती. सारिका क्षिरसागर | 67 ते 70 |


Scanned with OKEN Scanner

ISSN NO. 2250-0383

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील मवाळांचे योगदान

15

प्रा. डॉ. राजाराम रामदास सोनवणे
( इतिहास विभाग प्रमुख )
ॲड्. एम. एन. देशमुख महाविद्यालय राजूर ता. अकोले
जि. अहमदनगर ( महाराष्ट्र ) भारत

19 व्या भातकातील प्रबोधन चळवळीने आणि राष्ट्रवादाने जी एक वैचारिकता भारतात निर्माण केली त्यातूनच भारतीय स्वातंत्र्य चळवळीने प्रेरणा घेतली व चळवळ गतीमान झाली. या चळवळीतून मवाल व जहाल असे दोन विचारप्रवाह निर्माण झाले हे विचारप्रवाह म्हणजे विशिष्ट पध्दतीची वैचारीकत्ता होय. स्वातंत्र्य चळवळीच्या पहिल्या पर्वातील राष्ट्रीयसभेचे नेते हे उदारमतवादी विचारांचे होते. या मवाळ नेत्यांत दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, न्या. रानडे, ना. गोखले या नेत्यांचा समावेश होता स्वातंत्र्य चळवळीच्या पहिल्या पर्वावर याच महाराष्ट्रीय नेत्यांचा मोठा प्रभाव होता.

सन 1885 ते 1905 हा कालखंड राष्ट्रीय सभेचा प्रथम कालखंड समजला जातो या कालखंडात राष्ट्रीय सभेवर मवाळ विचार सरणीच्या नेत्यांचा प्रभाव होता म्हणून हा कालखंड मवाळ कालखंड म्हणून ओळखला जातो. मवाळ विचारसरणी म्हणजे सनदशीर मार्गावर विश्वास ठेवणारे, कायद्याची लक्ष्मणरेशा न ओलांडणारी विचारधारा होय. आपले म्हणणे सरकार पुढे मांडून संघर्श न करता मिळेल ते पदरात पाडून घेणे या प्रकारची वृत्ती म्हणजे मवाळ विचार सरणी होय.[1]

मवाळांच्या प्रेरणा पुढील प्रमाणे होत्या मवाळ नेत्यांवर पाश्चिमात्य विचारांचा प्रभाव होता. इंग्रज राज्यकर्त्यांच्या न्यायबुध्दीवर त्यांचा विश्वास होता. इंग्रजांचे राज्य ईश्वरी वरदान आहे असे त्यांना वाटत होते. सनदशीर मार्गवर त्यांचा दृढ विश्वास होता. म्हणजे इंग्रजी भाषेतून झालेल्या शिक्षणामुळे, इंगल्ड मधील लोकशाही परंपरेच्या प्रभावामुळे एक नवा सनदशीर मार्ग मवालांना आकर्शित करून लागला होता. आपल्या मार्गच्या अर्ज, विनंत्यांच्या मार्गाने मांडाव्यात, वृत्तपत्रातून लेख लिहावेत, शिष्टमंडळे पाठवित व शासनाशी चर्चा करावी असे सनदशी राजकारण करावे असे या सुशिक्षित भारतीय तरूणांना वाटू लागले इंग्रज राज्यकर्ते अशा सनदशीर मार्गांना प्रतिसाद देतील व आपले प्रश्न सोडविले जातील असा या तरूणांना विश्वास असल्यामुळे त्यांची वृत्ती मवाळ राहिली.[2]

मवाळांमध्यये पराकोटीची सहनशिलता होती, मवाळांना वस्तुस्थितीचे भान होते[3] इंग्रज हे अत्यंत बुध्दीनिष्ठ विवेकी असे भासक असून न्यायबुध्दीने वागणारे आहेत लोकशाहीवर त्यांची निष्ठा आहे प्रत्येक कार्य ते न्यायानुसार करतात. या संदर्भात महाराष्ट्रीय मवाळ नेते फिरोजशहा मेहता म्हणता की, ''इंग्रल हे न्यायप्रिय असल्यामुळे आमच्या मागण्यांचा ते सहानुभूतीपूर्वक विचार करतील यावदल आम्हाला मुळीच शंका नाही''.[4] अशा. प्रकारच्या दृढ विश्वासामुळे कॉग्रसची वाटचाल मवाळमार्गी राहिली.

सन 1885 मधील मुंबईचे राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन यशस्वी पार पाडल्यानंतर राष्ट्रीयसभेचे दुसरे अधिवेशन 1886 साली कलकत्ता येथे भरले. या अधिवेशनाचे अध्यक्षपद भूशिविण्याचा मान मुंबईचे मवाल नेते दादाभाई नौरोजी यांना मिळाला आपल्या अध्यक्षीय भाषणाने त्यांनी केलेले मार्गदर्शन मोलाचे ठरले त्यांनी आपल्या अधिकारवाणीने भारताच्या वाढत्या दारिद्रयाची कारणमीमांसा केली. सनदी सवेत प्रवेश मिळविण्यासाठी भारतात स्पर्धा परीक्षा घेतली जावी असा आग्रह धरला. केंद्रीय व प्रांतीक विधीमंडळातील भारतीयांची संख्या वाढविली जावी एवढीच मागणी करून ते थांबले नाहीत तर भारत हा ब्रिटीश साम्राज्याचा घटक असल्यामुळे भारतीय प्रतिनिधींना ब्रिटीश पार्लमेंटमध्ये स्थान मिळणे आव यक आहे नव्हे हा त्याचा अधिकारच आहे असे त्यांनी



Scanned with OKEN Scanner

ठामपणे प्रतिपादन केले. ब्रिटिशांच्या उदारममावादी तत्वाज्ञानाचे ऋण मान्य करून या तत्वज्ञानाची अंमलबजावणी मात्र भारतात केली जात नाही हे परखड शब्दात त्यांनी निदर्शनास आणले याच अधिवेशनात राष्टीयसभा ही राजकीय संस्था असावी ते समाजिक सुघारणा कार्याचे व्यासपीठ असू नये हा विचार त्यांनी ठामपणे मांडला.[5] त्यांचा हा विचार योग्यच होता कारण राष्ट्रीयसभा सुधारणा कार्याचे व्यासपीठ बनल्यास भिन्नवंशाचे, जातीचे व धर्माचे लोक असलेल्या भारतीय समाजात सुधारणांच्या स्वरूपावरून मतभेद होतील व लोक राष्ट्रीयसभेपासून दुरावतील म्हणून सर्व भारतीयांना सारख्याच निकडीच्या वाटणा–या राजकीय सुधावरच फक्त राष्ट्रीय सभेमध्ये विचारविनीमय व्हावा असे मत दादाभाईनी मांडले आणि त्याला सर्वांनी पाठीबा दिला[6] त्यांनी दिलेला हा गुरूमंत्र राष्ट्रीयसभेचे राष्ट्रीय स्वरुप टिकवून धरण्याच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त ठरला.

राष्ट्रीय सभेचे एकूण तीन वेळा अध्यक्ष होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. 1906 च्या राष्ट्रीयसभेच्या अध्यक्षपदावरून त्यांनी 'स्वराज्य' हे राष्ट्रीयसभेचे ध्येय असल्याचे जाहिर केले राष्ट्रीयसभेच्या व्यासपीठावरून प्रथमच 'स्वराज्याची' मागणी केली यावेळी राष्ट्रीयसभेत अंतर्गत जहाल–मवाळ वाद पराकोटीस गेला होता. या पार्श्वभूमिवर राज्यकर्त्यांच्या न्यासबुधीवर विश्वास ठेवून सनदशीर मार्गाने आपल्या हक्कासाठी लढा चालू ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले दादाभाई, ना. गोखले सर फिरायशहा मेहता इ. मावळ नेत्यामध्ये सनदशील चळवलीचा एक महत्वाचा फरक होता तो म्हणजे 'स्वदेशी' आणि वहिष्कार' यासारखी राजकीय चळवळीची अस्त्रे दादाभाईना सनदशीर चळवळीत बसणारी अस्त्रे वाटत होती. तर गोखले, मेहता इ. ती जहालवादी' अस्त्रे वाटत होती अशा अर्थाने दादाभाईची विचारप्रणाली मवाळ व जहाल या दोन गटांच्या विचारप्रमाळीचा सुवर्ण मध्य साधणारी होती.[7]

1885 ते 1905 या काळखंडातील राष्ट्रीय सभेची खालील उदिष्टये स्पष्ट होती. 1) भारतातील अनेक भाषिक, वांशिक, धार्मीय, लोकाचे, एक सुदृढ राष्ट्र बनविने. 2) भारतीय राष्ट्राचे मानसिक, नैतिक, सामाजिक, राजकीय पुनरूत्थान करणे 3) इंग्लड आणि भारतीयांच्या दृष्टिने अयोग्य व अन्यायी आसलेल्या परिस्थितीध्ये आवश्यक ते परिवर्तन घडवून आणणे 4) भारतीयांना राजकीय दृष्टीने शिक्षित करून त्यांची राजकीय व आर्थिक प्रगती साधण्यासाठी त्यांची राजकीय संघटना उभीकरणे ही या काळातील राष्ट्रीय सभेची उदिष्टे होती.[8] या काळातील भारतीय समाजातील राष्ट्रीय जाणीव व मर्यादीत होती. या जाणिवेने भारत व इंग्लड यांच्यातील घनिष्ठ संबंधावर खास भर दिला राष्ट्रीयसभेच्या चळवळीचे तंत्रही पूर्णपणे, मावळ, घटनानिष्ठ कायद्याचा भंग न करणारे होते. उदिष्टये मर्यादित होती ते साध्य करण्यासाठी निवडलेले मार्गही सनदशीर होते ही गोष्ट यावरून स्पष्ट होते.

भारतातील मवाळ राजकारणाचे प्रतीक असलेले गोपाळ कृष्ण गोखल्यांना महात्मा गांधी आपले राजकीय गुरूमानीत 1915 मध्ये दक्षिण आफ्रिकेमधून भारतात परतल्यावर गांधीनी प्रथम त्यांच्याशी विचार विनिमय करून आपल्या राजकीय कार्याची दिशा ठरविण्यासाठी त्यांचा सहला घेतला.[9] गोखल्यांनी आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी नंहमीच सनदशीर मवाळ मार्गाचा अग्र धरला गोखलयानी भारतीयाच्या अडचणी, आशा– आकांशा सरकारच्या कानावर घातल्या आणि सरकारच्या अडचणी राष्ट्रसभेसमोर मांडल्या परिनामी भारतीयांनी त्यांच्या नेमस्त पणावर टिका केली. तर सरकारने त्यांच्यावर जहाल असल्याचा आरोप केला. ब्रिटिशांना पूर्वीप्रमाणे भारतामध्ये मनमानी कारभार करता येणार नाही असा स्पष्ट इशारा त्यांनी ब्रिटीशांना दिला होता.

ज्या वेळेस भारतीय समाज निद्रावस्थेत होता तेव्हा नेमस्त कामाला लागले होते बहुसंख्य समाज, शिक्षित आणि अशिक्षित, राष्ट्रीयत्वाच्या भावने बद्दल उदासीन होता. शिक्षितांना सरकारी नोक–यांचे आकर्षण होते त्यामुळे सरकार विरोधी चळवळीत भाग घेण्यात हा शिक्षित वर्ग फारसा उत्सुक होता असे नाही अशा समाजाला जागे करून त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागण्याचे महत्वपूर्ण काम मवाळांनी केले त्यांच्या या कार्यामुळे देशाच्या सर्व भागांतून स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण करण्यास तयार असलेला एक तरूण पिढी निमीन झाली पुढे स्वातंत्र्य चळवळीचे जे जन आदोलनाचे



Scanned with OKEN Scanner

रूप धारण केले. त्याचा उगम मवाळ काळखंडात होता. या काळखंडातील मवाळांचे योगदान फार मोठे आहे. मवाळांनी स्वातंत्र्याच्या चळवळीची पायाभरणी केली – सामाजिक व धार्मिक सुधारणा चाळवळीमुळे भारतीय समाजाचे प्रबोधन झाली होते त्यांच्या मनात भारतीय राष्ट्रीवादी भावनेचे बीज उत्पन्न झाले होते, त्याचे बीजारोपन करण्याचे कार्य मवाळांनी केले जनतेची संमती हेच कोणत्याही राजवटीचे खरे समर्थन असते. जनतेचा राज्यकर्त्यावरील वि वास हे त्या राज्यसत्तेचे नैतिक अधिष्ठान असते त्या अधिष्ठानाला सुरुंग लवण्यासाठी मवाळांनी वादाचे मुद्दे शोधून काढले त्यांना स्पष्टपणे जनते समोर मांडळे वादाच्या मुद्यांना केंद्रस्थानी ठेवून आपली रणनिती तयार केला त्यासाठी राजकीय आर्थिक कार्यक्रम तयार केला. समाज्यवाद्याचे खरे स्वरूप उघड केले. राज्यकर्ते जनतेची कशी पिळवूणक करतात हे लोकांना दाखवून देण्यासाठी दादाभाई नौरोजींनी आर्थीक शोशणावर प्रकाश टाकला. त्यामुळे ब्रिटिश राजवटीच्या भारतावरील आर्थिक दुष्परिणामाची जाणीव भारतीयांना झाली मवानांनी ब्रिटिश सरकारच्या राज्यकाभारावर व ध्येय धोरणावर वेळावेळी निर्भयपणे टिका केली. शासन व्यवस्थेतील भ्रष्टाचार, दडपशाइ, दिरंगाई यावर टिका दिली. त्या नाहीशा करून राज्यकारभारात सुधारणा करण्याचा आग्रह धरला. तसेच भारतीयांना प्रशासनात सामावून घेण्याची सतत मागणी केली. आर्थिक प्रश्नावरून संपूर्ण देशातील लोकमत ब्रिटिश सरकार विरूध्द जागृत केले. जनतेला संघटीत करून हिंदी स्वातंत्र्याच्या आंदोलनाची पायाभरणी करण्याचे काम मवालांनी केले. परिनामी स्वातंत्र्याच्या चळवळीचा उदय झाला.

**संदर्भसूची**


1) भोख गफूर ''आधुनिक भारताचा इतिहास'' प्रितम प्रकाशन जळगांव प्रथमावृत्ती जून 2005 पृष्ठ नंबर 273

2) जाधव वसंत ''आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास'' विद्या प्रकाशन नागपूर प्रथमावृत्ती 2005 पृष्ठ 74

3) भोख गफूर उपरोक्त पृष्ठ 273

4) जाधव वसंत उपरोक्त पृष्ठ 75

5) कित्ता पृष्ठ 75

6) कित्ता पृष्ठ 76

7) पवार जयसिंग ' ''भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास'' निराली प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती 1996 पृष्ठ 112

8) काळे म.वा.'भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास'' मुरलीधर प्रकाशन पुणे पृष्ठ 88

9) कित्ता पृष्ठ 93




Scanned with OKEN Scanner